# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक- १४ जानेवारी २०१५

## मुंबई विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ २४ जानेवारी रोजी

## डॉ. अनिल काकोडकर असणार प्रमुख पाहूणे

## एकाचवेळी सर्व महाविद्यालयात साजरा होणार सोहळा

## मुंबई विद्यापीठाचा महत्वाकांक्षी निर्णय

मुंबई – मुंबई विद्यापीठात शिकणा-या प्रत्येक विद्यार्थ्याला दीक्षान्त समारंभात पदवी प्राप्त करण्याचा बहुमान मिळावा यासाठी मुंबई विद्यापीठाने महत्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. २४ जानेवारीला आयोजित होणारा दीक्षान्त समारंभ हा प्रत्येक महाविद्यालयातही साजरा केला जाणार आहे.त्यामुळे मुंबई विद्यापीठाशी सलंग्नित असलेल्या महाविद्यालयामध्ये शिकणा-या विद्यार्थ्याला त्याचे पदवी आणि पदवी प्रमाणपत्र त्याच दिवशी मिळणार आहेत.त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयामध्ये त्याच दिवशी पदवी वितरण समारंभ आयोजित केला जाणार आहे.

मुंबई विद्यापीठाचा वार्षिक दीक्षान्त समारंभ हा २४ जानेवारी रोजी पार पडणार असुन या दीक्षान्त समारंभासाठी अणुउर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.अनिल काकोडकर हे प्रमुख पाहूणे असणार आहेत.सकाळी ११ ते १ वाजेच्या दरम्यान मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी संकूलात या दीक्षान्त समारंभाचे आयोजन करण्यात आले असुन सलंग्नित महाविद्यालयामध्ये पदवी वितरण समारंभामध्ये ३ ते ६ वाजेपर्यंत पदवी प्रमाणपत्रांचे वितरण केले जाणार आहे.महाविद्यालयामध्ये आयोजित होणा-या पदवी वितरण समारंभासाठी महाविद्यालयातर्फे प्रमुख पाहूण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण केले जाणार आहे.ज्या महाविद्यालयांना २४ जानेवारी रोजी पदवी वितरण समारंभ आयोजित करता येणार नाही अशा महाविद्यालयांना २ फेब्रुवारी रोजी हा सोहळा आयोजित करता येणार आहे.

मुंबई विद्यापीठाच्या वार्षिक दीक्षान्त समारंभ हा सकाळी ११ वाजता सुरु होणार असुन त्याचे लाईव्ह वेबकास्ट करण्यात येणार असुन ते सर्व महाविद्यालयात पाहता येणार आहे.यावर्षी आयोजित होणा-या दीक्षान्त समारंभात जवळपास १ लाख ४५ हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येतील.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार यंदा प्रथमच सलंग्नित महाविद्यालयामध्ये हा पदवी वितरण समारंभ होणार आहे.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)